**प्रस्तावना :-**

जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत जलसंधारण हा विभाग आहे. या विभागांतर्गत ० ते १०० हेक्टर ची जलसंधारणाची कामे केली जातात. सध्या जमिनीच्या किमती गगनाला भिडलेल्या असल्याने मोठे प्रकल्प तयार करण्यास भूसंपादनाच्या अडचणी येत आहेत. त्यामुळे लहान जलसाठे निर्मित करून जलसंवर्धन करणे सोयीस्कर ठरते. जमिनीवर पडलेले पावसाचे पाणी शास्त्रीय पद्धतीने जमिनीत मूरउन भूजल पातळीमध्ये वाढ करणे हाच जलसंधारण विभागाचा मुख्य उद्देश आहे.

या विभागाअंतर्गत जलसंधारण कामासोबतच मस्त्यपालन व्यवसाय वाढीसाठी तलाव ठेक्याने देऊन त्याद्वारे रोजगार निर्मिती व उत्पन्नवृद्धीसाठी मदत केल्या जाते.

**जलसंधारणाचे प्रकल्प मुख्यत्वे खालील प्रमाणे आहेत.**

१) सिंचन तलाव
२) पाझर तलाव
३) गाव तलाव
४) मा.मा.तलाव
५) को.प.बंधारे
६) सिमेंट बंधारे
७) काम्पोजिट ग्याबियन बंधारे

सद्य स्थितीत नवीन तलाव निर्माण करण्यासाठी साईट फारच कमी असल्याने त्या तलावाची/को.प.बंधाऱ्याचे आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती करून पाणी साठा पुनर्स्थापित केला जातो. छोट्या नाल्यावर योग्य जागेची निवड करून सिमेंट बंधाऱ्यांची निर्मिती केली जाते. नाल्याची उंची कमी असल्यास कमी खर्चात काम्पोजिट ग्याबियान बंधारे बांधण्यात येतात.

जलसंधारणाचे प्रकल्पाची व्याख्या सर्वसाधारण खालील प्रमाणे आहे.

**सिंचन तलाव** :- नदी असलेल्या ठिकाणी जमिनीची दोन्ही उंच असलेली टोके माती बांधांनी जोडून जलाशय निर्माण केला जातो. जलाशयासाठी जमिनीत पाणी जास्त प्रमाणात न मुरता साठवलेले पाणी सिंचनासाठी वापरता येण्यायोग्य जमीन निवडलेली असते. सिंचन तलावाचा उद्देश जलाशयातून प्रवाही व उपसा पद्धतीने सिंचन करणे हा असतो.

**पाझर तलाव** :- सिंचन तालावाप्रमानेच जलाशयाची निर्मिती केली जाते. पाझर तलावाचा उद्देश जमिनीत पाणी मोठ्या प्रमाणात मुरवून पाणी पातळी वाढवणे हा उद्देश असतो. या तलावातून सरळ पद्धतीने सिंचन केल्या जात नाही. अप्रत्यक्ष सिंचन होते.

**गाव तलाव** :- सहसा गावापासून जवळ जलाशय तयार करून घरगुती, पशुपक्षी, इ. वापरासाठी व अप्रत्यक्ष सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणे हा गाव तलावाचा उद्देश असतो.

**को.प. बंधारे** :- नदी, नाला पात्रात लोखंडी गेटने बांध घालून पावसाळ्या नंतरचे वाहाते पाणी अडऊन सिंचन करणे हाको.प. बंधाऱ्याचा उद्देश असतो. प्रवाह आटल्यानंतर लोखंडी गेट काढून नदी पात्र मोकळे केले जाते. त्यामुळे नदी पात्रात गाळ जमा होत नाही.

**मा.मा. तलाव** :- मोठ्या घनतेने पडणाऱ्या पाऊसाचे पाणी जमिनीवर बांधाद्वारे आडवून अडवलेले पाणी लहान गेट द्वारे कमी गतीने सिंचनासाठी वापरणे हा मालगुजारी तलावाचा उद्देश आहे. या तलावाचा मुख्यत्वे खरीप पिकासाठी प्राधान्याने भातशेतीसाठी वापर होतो.

**सिमेंट बंधारे/कंपोजीट ग्याबियन बंधारे** :- लहान नाल्यातून वाहून जाणारे पाणी आडवून जमिनीत पाणी मुरवणे हा सिमेंट बंधारे/कंपोजीट ग्याबियन बंधारे चा मुख्य उद्देश आहे. याद्वारे अप्रत्यक्ष सिंचन होते.

जिल्हा जलसंधारण अधिकारी
जिल्हा परिषद (ल.पा.) नांदेड